**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी
प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.
**(जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय**
**विश्रामगृहे आरक्षित केल्याबाबत.)**

**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड**
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को./सीआर-
दि. १३/०४/२०२०

वाचाः- १) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/ २०२० / प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
४) या कार्यालयाचे फौजदारी संहिता दंडप्रकियेचे कलम १४४ चे आदेश क्र.२०२०/आरबी-१ /डेस्क-२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र. दि.२५.०३.२०२० व दिनांक १३.०४.२०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले असून संदर्भ क्र.०४ वर नमुद आदेशानुसार संपूर्ण नांदेड जिल्हयात फौजदारी संहिता दंडप्रकियेचे कलम १४४ लागू आहे.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन इटनकर (भा.प्र.से) , जिल्हाधिकारी, नांदेड साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतूदीनूसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय विश्रामगृहे हे केवळ डॉक्टर, पॅरामेडीकल स्टाफ तसेच, कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने अत्यावश्यक सेवा बजावणारे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी पुढील आदेशापावेतो राखीव ठेवण्यात येत आहेत.

Scanned with CamScanner

सदर आदेशाची अंमलबजावणी सर्व उपविभागीय अधिकारी तथा Incident Commander तसेच, सर्व तहसिलदार, तथा Assistant Indent Commander यांनी तात्काळ प्रभावाने अंमलात आणावी.

आणि असेही आदेशित करीत आहे की, जे कोणी व्यक्ती, समुह सदर आदेशाचे उल्लंघन करील, त्यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये व भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

०१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी – आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३. पोलीस अधीक्षक, नांदेड
४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
५. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. जिल्हा माहीती अधिकारी, नांदेड

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned with CamScanner